# महिला बोलायला लागल्या तर महापुरुषांची गरज संपेल!

## ज्येष्ठ साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांचे प्रतिपादन

पुस्तकाचे प्रकाशन करताना सुरेश द्वादशीवार, शेजारी इतर मान्यवर.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महिला मोकळपणाने दुःख सांगू शकत नाही. ज्या दिवशी महिला बोलायला लागतील त्यादिवशी महापुरुषांची गरज संपेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांनी केले.

मनोविकास प्रकाशन पुणे आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राच्यावतीने लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांच्या 'सूर्य गिळणारी मी' या आत्मचरित्राचे प्रकाशन द्वादशीवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रभाषा संकुलाच्या बाबुराव धनवटे सभागृहात शनिवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला डॉ. प्रमोद मुनघाटे, ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने, लोकनाथ यशवंत, प्रकाशक अरविंद पाटकर, कोमल ठाकरे उपस्थित होते. यावेळी द्वादशीवार म्हणाले, स्त्रीयांच्या पदरी अनेक दुःख आले. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले त्यामुळे ती उपेक्षित राहिली. माझ्या देहावर माझा अधिकार आहे. या देहाला त्रास देऊ नका असे स्वातंत्र्य ठेवत जगता आले पाहिजे.

आपल्याला आपल्याच जवळची माणसेही वाचता आली पाहिजे. अरुणाने भोगलेल्या दुःखावर मात करत ती मुलांवर संस्कार करत जीवन जगली. त्यामुळे ती खऱ्या अर्थाने मागदर्शक आहे आणि तिचे आत्मचरित्रपर पुस्तक हे अनेक अन्यायग्रस्त स्त्रीयांना प्रेरणा देणारे ठरेल असेही द्वादशीवार म्हणाले. डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी पुस्तकावर भाष्य केले. अरुणा सबाने यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रकाशक अरविंद पाटकर यांनी पुस्तक प्रकाशनविषयी अनुभव सांगितले. संचालन मंजुषा सावरकर यांनी केले.

# प्रेमीयुगुलाची रेल्वेखाली आत्महत्या

## तीन दिवसांपूर्वीच पलायन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** प्रेमप्रकरणातून एका अल्पवयीन प्रेमीयुगुलाने शुक्रवारी रात्री कन्हान आणि कामठी दरम्यान रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केली. सायली नगराजे (१६, जयभीम चौक) आणि आदित्य लक्ष्मीनारायण कुरील (१८, जयभीम चौक) असे आत्महत्या करणाऱ्या प्रेमीयुगुलाची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायलीच्या वडिलाचा मृत्यू झाला असून तिची आई मजुरीचे काम करते. तिला लहाण बहीण आणि भाऊ आहे. तिचे आदित्यसोबत प्रेमसंबंध होते. गेल्या आठवड्यात सायली फोनवर आदित्यसोबत बोलतताना आढळल्यामुळे आईने तिला रागावले. ८ मार्च रोजी तिची आई कामावर गेली असता सकाळी आदित्यने सायलीला दुचाकीवरून पळवून नेले. दिवसभर सायली घरी न आल्याने तिच्या आईने शोध सुरू केला. परंतु, कुठेही तिचा पत्ता लागला नाही.

दरम्यान, वस्तीतच राहणारा आदित्य देखील बेपत्ता असल्याचे समजले. सायलीच्या आईने आदित्यच्या आईची भेट घेतली. त्यानंतर त्यांचे लग्न लावून देण्याचा निर्णय घेण्यात आला. दोन दिवस झाले तरी दोघेही घरी न आल्याने शेवटी १० मार्च रोजी सायलीच्या आईने नवीन कामठी पोलीस ठाण्यात तक्रार केली. या तक्रारीवरून पोलिसांनी आदित्यवर अपहरणाचा गुन्हा दाखल केला व आदित्यच्या मोबाईलचे लोकेशन घेतले असता तो कामठी परिसरातच असल्याचे निदर्शनास आले. पोलीस त्यांचा शोध घेत होते.

### गुन्हा दाखल होताच आत्महत्येचा निर्णय

पोलिसांनी आदित्यवर अपहरणाचा गुन्हा दाखल केल्याचे दोघांनाही समजले. पोलीस आदित्यला अटक करतील. त्याला मारहाण करतील. त्याला कारागृहातही जावे लागेल, असे विचार त्यांच्या मनात आले. या भीतीमुळे दोघांनीही आत्महत्येचा निर्णय घेतला.

### रेल्वे चालकाने प्रयत्न केला...पण?

अहमदाबाद एक्सप्रेस कामठीच्या दिशेने येत असतानाच दोघेही रेल्वे रुळावर झोपले. चालकाच्या लक्षात हा प्रकार येताच त्यानेने वारंवार हॉर्न वाजवत त्यांना बाजूला होण्याचा इशारा दिला. तसेच गाडीही थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु, गाडी वेगात असल्याने दोघेही रेल्वेखाली चिरडले गेले. चालकानेच ही माहिती कामठी स्थानकाच्या उपस्थानक व्यवस्थापकाला दिली. कामठी पोलिसांना ही माहिती समजताच परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त मनिष कलवानिया, नवीन कामठीचे ठाणेदार संतोष वैरागडे, निरीक्षक कमलाकर गड्डीमे सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले.

# २४ तासांत ७ नवीन करोनाग्रस्तांची भर

**नागपूर :** जिल्ह्यात २४ तासांत एकही करोनाग्रस्ताचा मृत्यू झाला नाही, ७ नवीन रुग्णांची भर पडली. शनिवारी शहरातील सक्रिय करोनाग्रस्तांहून ग्रामीणमध्ये अधिक रुग्ण होते.

सक्रिय रुग्णांमध्ये शहरातील ३४, ग्रामीण ३६, जिल्ह्याबाहेरील १ अशा एकूण ७१ रुग्णांचा समावेश आहे. २४ तासांत शहरात २, ग्रामीणला ५ असे एकूण ७ नवीन रुग्ण आढळले. त्यामुळे शहरातील आजपर्यंतच्या करोनाग्रस्तांची संख्या ३ लाख ९९ हजार ५९३, ग्रामीण १ लाख ६८ हजार १४७, जिल्ह्याबाहेरील ९,९४५ अशी एकूण ५ लाख ७७ हजार ६८५ रुग्णांवर पोहचली. दिवसभऱ्यात शहरात ४, ग्रामीणला ६ असे एकूण १० व्यक्ती करोनामुक्त झाले. त्यामुळे शहरातील आजपर्यंतच्या करोनामुक्तांची संख्या ३ लाख ९३ हजार ५१६, ग्रामीण १ लाख ६५ हजार ४८४, जिल्ह्याबाहेरील ८,२७७ अशी एकूण ५ लाख ६७ हजार २७७ व्यक्तींवर पोहचली.

**दक्षिण पूर्व सेन्ट्रल रेलवे**
**ई टेन्डर नोटिस**
**टेन्डर नोटिस नं ई-आर-टी-03-22-23**
**दिनांक 10/03/2022**

**कामाचे नांव:** 3 संख्येत असलेले गेटसचे इन्टरलॉकिंग, एलसी नं डीडी - 08 (एमएक्सए - डीएलबीएस सेक्शन), एलसी नं डीडी-39 (जीडीझेड - एलबीओ सेक्शन) आणि डीडी 46 (एलबीओ - बीएक्सए सेक्शन).
**टेन्डर मूल्य:** रु. 2171914/- **ईएमडी:** रु. 43400/-
**टेन्डर जमा करण्याची तारीख आणि वेळ:** 07/04/2022 सकाळी 11:00 पर्यन्त
**टेन्डर उघडणे:** 07/04/2022 सकाळी 11:00 वाजता
टेन्डर दस्तावेज संबंधी खरेदी/ पुढील माहिति, पात्रता मापदण्ड आणि एकूण वगैरे कामाबद्दल संपूर्ण माहिति साठी, कृपा करुन वरिष्ठ डी ई एन (सीओ.)/ रायपुर यांना संपर्क करा किंवा टेन्डर दस्तावेज बघा/ डाउनलोड करा जो आमच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे: **www.ireps.gov.in**

वरिष्ठ डिविज़नल इन्जीनियर/ लाईन II
एस.ई.सी. रेलवे, रायपुर
PR/R/Engg./AP/173
South East Central Railway @secrail

# नागपूर सुधार प्रन्यास

(www.nitnagpur.org)
मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर, नागपूर – 440001

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नागपूर शहराच्या हद्दीतील खाजगी मालकीच्या जागांवर अस्तित्वात असलेल्या अनधिकृत अभिन्यासातील भूखंडधारकांना त्यांचे भूखंड महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करने श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम – 2001 मधील कलम 3(1) मध्ये दि. 12.03.2021 रोजी सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार दिनांक 31 डिसेंबर 2020 पूर्वी झालेली अनधिकृत बांधकामे व मोकळी भुखंड नियमितीकरण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहे.**

1. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुर नागपूर शहराच्या हद्दीतील खाजगी मालकीच्या जागावर अस्तित्वात असलेल्या अनधिकृत अभिन्यासातील भूखंड धारकांना वैध कागदपत्र व इतर नियमांची पूर्तता करण्याच्या अटीवर दिनांक 14/03/2022 ते 13/05/2022 पर्यंत भुखंड नियमाधिन करण्याकरीता अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. खालील शर्ती अटीचे अधीन राहुन नागपूर सुधार प्रन्यासकडुन भूखंडांचे आवेदनपत्रे स्वीकारण्यात येतील.
2. आवेदनपत्रासोबत ना परतावा तपासणी शुल्क रू. 1000/– व भुखंडाच्या क्षेत्रफळानुसार मोजणी फि किमान रू. 2000/– प्रति भुखंड व रू. 5/– प्रती चौ.मी. जी भरणे अनिवार्य आहे. सदर रक्कमेचा भरणा युनियन बँक ऑफ इंडीयाच्या कोणत्याही शाखेत किंवा ऑन लाईन पध्दतीने करता येईल.
3. नागपूर सुधार प्रन्यासच्या स्टेशन रोड, सदर, नागपूर यांच्या संकेत स्थळ **www.nitnagpur.org** या संकेत स्थळावर दिनांक 14/03/2022 ते 13/05/2022 या कालावधीत स्वीकारण्यात येतील.
4. अर्जदाराने आपल्या भुखंडाचे दस्तावेज स्कॅन करून वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर प्रस्तावित नमुन्यात upload करणे अनिवार्य आहे, अर्ज अपलोड केल्यावर नासुप्रतर्फे भ्रमणध्वनीवर येणाऱ्या संदेशाच्या दिनांकानुसार आपण आपला अर्ज दस्तावेजासह व शुल्काच्या पावतीसह (तपासणी व मोजणी) संबंधीत नासुप्रच्या विभागीय कार्यालय (पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण) येथे पोचपावतीसह जमा करणे अनिवार्य राहील
5. अर्जासोबत **(अ)** भुखंडाचे विक्रीपत्र/आखिव पत्रिका **(ब)** भुखंड समाविष्ठ असलेल्या अभिन्यासाचा नकाशा **(क)** बांधकाम असल्यास अस्तित्वात असलेल्या बांधकामाचा नकाशा **(ड)** रहिवासी पुरावा (जसे इलेक्ट्रीक बिल, आधार काडे) इत्यादी मालकी हक्काबाबतचे दस्तावेज सादर करणे अनिवार्य आहे.
6. प्रत्येक भूखंडाकरिता वेगवेगळे आवेदनपत्र भरावयाचे आहे.

**मनोजकुमार सूर्यवंशी**
**सभापती**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर**

जाहिरात क्र. अधी.अभि./38/2021–22
दिनांक : 11.03.2022

# प्रसिद्ध व्यवसायी अशोककुमार गांधी यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध व्यवसायी अशोककुमार उपाख्य ए. के. गांधी यांचे हृदयविकाराने निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते.

गेल्या काही दिवसांपासून प्रकृती अस्वस्थामुळे त्यांना सीम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शुक्रवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. अशोककुमार गांधी यांनी अनेक वर्षापासून शहरातील नामवंत शिक्षण संस्था असलेल्या नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम बघितले. प्रसिद्ध वाहन विक्रेते म्हणून ए. के. गांधी यांचा लौकिक होता. विविध सामाजिक संघटनाशी ते जुळलेले होते. रामदासपेठ येथील त्यांच्या निवासस्थानावरुन अंत्ययात्रा निघून मोक्षधाम घाटावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीत महिलांचा सहभाग महत्त्वाचा - डॉ. नीलम गोऱ्हे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

कार्यक्रमात बोलताना डॉ. नीलम गोऱ्हे.

**नागपूर :** सामूहिक वनहक्क मान्य करताना ग्रामसभांना महत्त्व दिले गेले. त्यासाठी रोजगार हमी योजनेस अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले. त्यात महिलांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज येथे केले.

विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, खोज, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, ग्राम आरोग्य, रिवार्ड, इश्यू, संदेश, जीएसएमटी आणि ग्रामसभा महासंघाच्या विद्यमाने येथील एनबीएसएस ॲन्ड एलयुपीच्या सभागृहात आयोजित सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभा पदाधिकाऱ्यांच्या विदर्भस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'सामूहिक वनहक्क प्राप्त गावांचा जल आणि जंगलांच्या आधारे विकासामध्ये शासनाची भूमिका आणि राज्य पातळीवर समन्वय' या विषयावर डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, अपर मुख्य सचिव नंदकुमार, मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, सल्लागार अमित कळसकर, दिलीप गोडे, ॲड. पौर्णिमा उपाध्याय, वासुदेव कुळमेथे, डॉ. किशोर मोघे, डॉ. रुपचंद देखणे, गुणवंत वैद्य आदी व्यासपीठावर उपस्थित होते. दिलीप गोडे यांनी प्रास्ताविक केले. संचालन गुणवंत वैद्य तर आभार ॲड. पौर्णिमा उपाध्याय यांनी मानले.

## आठवीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

**नागपूर :** आठव्या वर्गाच्या विद्यार्थ्याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही खळबळजनक घटना शुक्रवारी सकाळी एमआयडीसी परिसरात उघडकीस आली. नितीन चुन्नीलाल पोगळे असे मृत मुलाचे नाव आहे. नितीन याचे वडील खासगी काम करतात. काही दिवसांपूर्वी त्याची आई व बहीण गोंदिया येथे गेली. नितीन व त्याचे वडील घरी होते. शुक्रवारी सकाळी नितीनने टीव्हीचा आवाज वाढविला. पंख्याच्या हुकला ओढणी बांधून गळफास घेतला. शेजाऱ्याने हाक मारली. प्रतिसाद मिळाला नाही. खिडकीतून बघितले असता तो गळफास लावलेला दिसला. माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव तेथे पोहोचले. नितीन याच्या आत्महत्येचे कारण कळू शकले नाही.

## वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**नागपूर :** रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाची धडक बसल्याने उमेश वीरेंद्रकुमार मिश्रा (४०) या पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. शुक्रवारी सकाळी १० च्या सुमारास ही घटना घडली. उमेश अमरावती मार्गावरील वडधामना येथील महाराष्ट्र-गुजरात लाईनसमोर रस्ता ओलांडत होते. त्याचवेळी अज्ञात वाहनचालकाने त्यांना जोरदार धडक दिली. गंभीर जखमी झाल्याने उमेशचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

**वार्षिक सर्वसाधारण सभा जाहीर सूचना**

लोक शिक्षण प्रसारक मंडळ वर्धा र.नं. एफ-५९ या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९/०३/२०२२ मंगळवार सकाळी ११.०० वाजता लोक महाविद्यालय, वर्धा येथे आयोजित केलेली आहे. संस्थेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया सभेला उपस्थित असावे, ही नम्र विनंती. विषयपत्रिका आवश्यक कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध करून ठेवलेले आहेत,कृपया नोंद घ्यावी.
वर्धा
दि:-११/०३/२०२२

-विनीत-

प्रकाश भोयर
सचिव
लोक शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा

डॉ. गजानन कोटेवार
अध्यक्ष
लोक शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा

**दक्षिण पूर्व सेन्ट्रल रेल्वे**
**विविध कामांसाठी ई टेन्डर नोटिस**
**क्रमांक (1) टेन्डर क्रमांक SECR-HQ-Engg-BL-21-22-15**

**कामः** सध्या असलेल्या प्लेट गर्डर्स यांना नवीन स्टील प्लेट गर्डर्सने बदलणे (पुन्हा गर्डरिंगचे काम) ब्रिज क्रमांक 250 यूपी (२०40') वर एसकेएस-डीकेएस-स्टेशन मध्ये जे एसएसई/ ब्रिज/गोंदिया नागपुर डिविजन यांच्या कार्यक्षेत्रात आहे
**टेन्डर मूल्य रु 31,74,227.04. ईएमडी: रु. 63,500.00 बोली सुरु करण्याची तारीख: 17/03/2022 टेन्डर बंद होण्याची तारीख आणि वेळ: 16:30 दिनांक 31/03/2022**
वरील कामासंबंधी पुढील तपशिलासाठी कृपया संपर्क करा डीवाय.सीई /ब्रिज लाईन/ बीएसपी कार्यालय किंवा वेबसाईट www.ireps.gov.in

द्वारे सीई / बीआर./ लाईन
सीपीआर/10/375 एस.ई.सी. रेलवे/बिलासपुर
दक्षिण पूर्व सेन्ट्रल रेल्वे @secrail

**सार्वजनिक सूचना**

सर्वसाधारण यांना ही सूचना देण्यात येते कि कोटक महिन्द्रा बँक कडून खालील वाहनांसाठी लिलाव आयोजित केला गेला आहे.

1) **भारतबेन्ज CB_BB3128C**
**MH31FC3109**
**निर्माण वर्ष 2018**
**किमान राखीव किंमत 1587455/-**
2) **टाटा मोटर्स लिमिटेड टिपर _LX_3130K**
**MH31FC3582**
**निर्माण वर्ष 2019**
**किमान राखीव किंमत 1568736/-**

मेसर्स कोटक महिन्द्रा बँक संबंधी गृहितकाखाली हे विक्रय 'जसे आहे, जिथे आहे स्थिति' अन्तर्गत होणार असून यात इच्छुक पक्ष आपले कोटेशन (ऑनलाईन/ऑफलाईन) या सूचना प्रकाशनाच्या 15 दिवसांच्या आत 28/3/2022 पर्यंत किंवा त्या आधी पाठवू शकतात.

kotak
Kotak Mahindra Bank Ltd.,

**शाखा पत्ता**
**कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड**
पहिला मजला, शेन्दे कॉम्प्लेक्स
प्लॉट न: 274, सीए रोड चप्रू नगर चौफुली
नागपुर 440008
**किंवा**
**संपर्क: जहीर मोहम्मद**
संपर्क 9764443833
ईमेल:
zaheer.mohammed@kotak.com

ICICI Home Finance

**कॉर्पोरेट कार्यालय:** आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड आईसीआईसीआई एचएफसी टावर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई 400059, भारत
**शाखा कार्यालय:** आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड पहिला मजला, गोकुल रोशन, प्लॉट नं 25 आणि 26, झेन्डा चौक, धर्मपेठ, नागपुर 440001

**(नियम 8(6) संबंधी तरतूद बघा)**
**स्थावर संपत्तिच्या विक्रय संबंधी नोटिस**

सिक्योरिटायजेशन एन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स एन्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सिक्योरिटी इन्ट्रेस्ट एक्ट 2002 नियम 8(6) प्रमाणे सिक्योरिटी इन्ट्रेस्ट (अंमलबजावणी) नियम 2002 संबंधी स्थावर संपत्तिचे ई लिलाव विक्रय नोटिस
सर्वसाधारण जनतेला नोटिस दिले जात आहे आणि मुख्यत्वाने कर्जदार आणि जामिनदारयला जे खालील स्थावर संपत्ति गहाण/ठेव संबंधी आहेत आणि सुरक्षित ऋणदात्याकडून याबद्दल भौतिक ताबा घेतला गेला असून आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी यांच्याकडून ही संपत्ति खालील तपशिल अनुसार 'जिथे आहे, जशी आहे' आणि 'जिथे आहे' आधारावर विकली जाणार आहे:

| क्रमांक | कर्जदार/ सहकर्जदार / जामिनदार/ वैधानिक वारसदार यांचे नांव. कर्ज खाता क्रमांक | सुरक्षित संपत्तिचे तपशिल आणि काही ओझे असल्यास | बाकी रक्कम | राखीव मूल्य<br>ईएमडी | संपत्ति निरीक्षणाची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| (A) | (B) | (C) | (D) | (E) | (F) | (G) |
| 1 | गोपाल मंगलदास सोनी (कर्जदार) सोनल गोपाल वर्मा (सह कर्जदार) कर्ज खाता क्रमांक NHTMS00000902185 | नजूल संपत्ति नं 49 पीएचके नं 16 थक नं 26 बोस अगर सुबोग बँक जवळ, छोटी सराफा लाईन, बोस वार्ड तुमसर सिटी सर्वे नं 2117 शीट नं 43 तुमसर महाराष्ट्र 441912 | रु. 4588685/- दिनांक 10 मार्च 2022 पर्यन्त | रु. 3800736/-<br>रु. 380074/- | मार्च 24, 2022 सकाळी 11:00 ते दुपारी 2:00 | मार्च 28, 2022 दुपारी 2:00 ते 3:00 |
| 2 | राजेश प्रभाकर पल्हडकर (कर्जदार) करुणा प्रभाकर पल्हडकर (सह कर्जदार) कर्ज खाता क्रमांक LHCPR00001264458 | तिसरा मजला श्री बालाजी टावर छत्रपति नगर चन्द्रपुर मौजा देवाई गोविंदपुर रयातवाडी सर्वे नं 107/9 ए1 टीएस नं 11 फ्लैट नं टीएफ 03 चन्द्रपुर 442401 | रु. 2330376 दिनांक 10 मार्च 2022 पर्यन्त | रु. 1415409/-<br>रु. 141541/- | मार्च 24, 2022 सकाळी 11:00 ते दुपारी 2:00 | मार्च 28, 2022 दुपारी 2:00 ते 3:00 |

हे ऑनलाईन लिलाव वेबसाईट **(यूआरएल लिंक - https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/)** वर होणार असून ही आमची लिलाव एजेन्सी टायगर यांची वेबसाइट आहे. गहाण/ नोटिस प्रमाणे शेवटची संधि दिली जात आहे जी एकूण बाकी आणि पुढील व्याजासकट **25 मार्च 2022 पर्यन्त संध्याकाळी 5:00** पूर्वी भरावे, नाहीतर ही सुरक्षित संपत्ति दिलेल्या प्रकाराप्रमाणे विकली जाणार.
संबंधित बोली लावणारी व्यक्तिने ईएमडी रक्कम आरटीजीएस/डिमान्ड ड्राफ्ट द्वारे (कॉलम ई बघा) **आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड पहिला मजला, गोकुल रोशन, प्लॉट नं 25 आणि 26, झेन्डा चौक, धर्मपेठ, नागपुर 440001** येथे **25 मार्च 2022 ला 4:00** च्या आधी भरावयाची आहे. ईएमडी जमा संबंधी डिमान्ड ड्राफ्ट राष्ट्रीयकृत/शेड्यूल्ड बँक संबंधी असून **'आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड - ऑक्शन'** नागपुर ला देय असावे. निरीक्षण, नियम आणि अटी, लिलाव किंवा टेन्डर जमा करण्याबद्दल कोणतीही पुढील माहिति हवी असल्यास कृपया **आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड यास 721072869** यावर संपर्क करावे.
अधिकृत अधिकारी यांच्याकडे हे अधिकार आहेत कि ते एखादी किंवा सर्व बोली कोणत्याही कारणाशिवाय रद्द करु शकतील.
विक्रय संबंधी अटी आणि नियम यांच्याबद्दल जास्त माहिति साठी आमची वेबसाईट बघा **https://www.icicihfc.com/**

**दिनांक: मार्च 13, 2022**
**स्थान: नागपुर**

**अधिकृत अधिकारी**
**आईसीआईसीआई होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

लोकसत्ता क्लासिफाइड्स
सगळ्यांकरिता सर्वकाही

**नोकरीविषयक**

**पाहिजेत**

**OTHERS**

**पाहिजेत** मालवणी कुक हॉटेल रिसॉर्टवर जोडप, भाड्याने कार ड्रायव्हर, राहण्याची सोय, टेलिकॉलिंगसाठी स्मार्ट मुलं/मुली - 8097641160/ 7977847436.
0070776752-1

**जागासंबंधी**

**जागाविषयक**

**OUT OF MUMBAI**

**चांदणी** चौक ह्या पुण्यनगरीचे महाद्वार नजिकच्या नामांकित प्रकल्पात सुसज्ज अशा सुविधा असणाऱ्या गृहसंकुलात भरभरून निसर्गाच्या सान्निध्यात आजच गुंतवणूक करून त्वरित ताबा घ्या! १बीएचके ३७ला., २बीएचके ६५ला., ३बीएचके ९५ला., स्टॅम्प ड्युटी वाढण्याआधी ३१ मार्चपर्यंत लाभ घ्या. (अतिरिक्त खर्च वेगळा). नो ब्रोकरेज. संपर्क- सतीश, ९४२२५२८६८६.
0090300620-1

**जागा पाहिजे**

**GENERAL**

**महाराष्ट्रातील** तालुक्यातील शहरांत मॉलसाठी टायटल क्लिअर प्लॉट. खरेदी भाड्यावर पाहिजेत. गुगल लोकेशन पाठवावेत - 8097641182/ 9702742924.
0070776751-1

**जमीन विकणे आहे**

**नेरळ** व भीमाशंकर हायवे जवळ निसर्गरम्य नसरापुर (तालुका- कर्जत) ला पेज नदीपासून १०० मीटर/ ५ मिनिटांवर १४० गुंठे (साडे तीन एकर) जमीन विकणे आहे. रिसॉर्ट, बांधकाम प्रकल्प, बंगलो प्रोजेक्टसाठी अत्युत्तम. जमीन पत्ताः सर्वे नं. १, हिस्सा नं. ६, ७, ८. मौजे- नसरापुर, तालुका- कर्जत. संपर्कः ९८२०५११३४६/ karjat2109@gmail.com
0070776396-1

**महत्त्वपूर्ण निवेदन**
[illegible]

**प्लॉट विक्रीविषयक**

**सोन्याहून संधी! पनवेल, खोपोली, लोणावळा, पांचगणी, लवासारुट डॅमव्ह्यू अलिबाग, दापोली, गोवा सी लगत ॲग्रोटुरिझम प्लॉटसाठी 8097641160. www.newunnati.in 8097641162.**
0070776753-1

**व्यावसायिक जागा**

**गार्मेंट,** ॲग्रोटुरिझम, विविध इंडस्ट्रियल, रनिंग ॲग्रोफुड हॉटेल, रिसॉर्ट चालविण्यास देणे घेणे, मोक्याच्या जागा- जमिनी विकत/ भाडेकरारासाठी, वाईन प्रोजेक्टमध्ये गुंतवणुकीसाठी - 9175284426/ 7977847436. www.newunnatti.in
0070776237-1

**मालमत्ताविषयक**

**अलिबाग नागावमध्ये ४२.५ गुंठे ३बंगले. किचन/ डायनिंग एरिया, क्लीअर टायटल, फायद्यातील रनिंग होम-स्टे रिसॉर्ट विकणे. अपेक्षा- ४.९९ कोटी. मालक- ८८५०६४२६००/ ९६५३२३१८०७**
0090300318-1

**सर्व्हिसेस**

**भविष्यविषयक**

**ॲस्ट्रॉलॉजीः** गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा-चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र - कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. २८८८९७०६/ ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070770835-1

**वैद्यकीय**

**''सुवर्णसंधी''** - जर तुम्ही Slip Disc, Sciatica किंवा मणक्याचे त्रासाने ग्रासले असाल, तर दुर्बिणीच्या (Endoscopy Spine) आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन ठीक होऊ शकता. ओम शिव साई संस्थातर्फे हे आधुनिक तंत्रज्ञान कांदिवली, मुंबई येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी डॉ. Mahesha, जे भारत आणि विदेशात प्रसिद्ध आहेत, त्यांची नियुक्ती करण्याच आली आहे. तरी सर्व गरजूंनी 9820022217 वर संपर्क साधावा. MRI असेल तर Whatsapp 9820022217 वर पाठवावा. अधिक माहितीसाठी www.mumbaipainclinic.com पहावी.
0070776777-1

**यात्रासहल**

**ज्ञानेश्वर-माऊली** उत्सव! सर्व वयोगटांतील मुले, पालक, ज्येष्ठांसाठी सुद्धा ५रा./६ दिवसांचे तन-मन सक्षम करणारे, अध्यात्मिक प्रगती साधणारे शिबीर निसर्गरम्य ठिकाणी, फक्त २५ साधक नोंदणीसाठी- दांडेकर, ठाणेः ९४२२१५१५९३/ ७२६१९०७६६८
0090300515-1

**जाहिरात छोटी, प्रतिसाद मोठा संपर्क-२४०६१०४, २४०६१०३**

ASPIRE

# ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई--400025.
**ई-मेलः** info@ahfcl.com **सीआयएनः-** यू65923एमएच2013पीएलसी248741

## ताबा सूचना (स्थावर मालमत्ता/ मत्तांसाठी)

ज्याअर्थी ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. चे सिक्युरीटायझेशन ॲंड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 (नमूद नियम) च्या नियम 8(1) च्या सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन ॲंड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002(नमूद कायदा) च्या कलम 13 (12)अंतर्गत, देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून संबंधित कर्जदार/ रांना नमूद नोटीस/नोटीसेस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत प्रत्येक खात्याच्या समोर देण्यात आलेल्या रकमेचा भरणा करण्यासाठी जारी करण्यात आली होती.
कर्जदार/दारांना थकीत रकमेचा भरणा करता न आल्याने, कर्जदार/रांना आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकार ह्यांनी खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्ता/ मत्तांचा नमूद नियमांच्या नियम 8 सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम 13 (4) च्या अंतर्गत देण्यात आलेय अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद करण्यात आलेल्या दिनांकाला कब्जा घेतला आहे.
विशेषतः कर्जदार/रांना आणि सामान्य जनता ह्यांना ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तांशीकोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार झाला असल्यास कर्ज करारच्या अनुसार रकम आणि व्याजाचा भरणा ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरिशन लि. कडे भरणा करण्यास पात्र असतील. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम 13 च्या पोटकलम (8) मध्ये देण्यात आलेल्या तरतुदींकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

| अनु क्र. | कर्ज करार क्र./ कर्जदार/सह कर्जदार/ हमीदाराचे नाव | डिमांड नोटीस दिनांक आणि रक्कम | ताबा घेतल्याचा दिनांक | गहाण मालमत्ता/मत्तांचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | एलएक्सएनएजी00315-160004389 रमेश पतीदेव ढगे आणि शांताबाई पतीदेव ढगे | रु. 2579085/- करीता 26-08-2019 | 09-03-2022 | प्लॉट क्र. 12 केएच. क्र. 266 (जुना केएच क्र. 350 आणि 354) सीटीएस क्र. 1445. शीट क्र. 11+12, मौजे काटोल, पी.एच. क्र. 44, एच.क्र. 36, फिस्के ले आउट, धंतोली, काटोल, गणेश मंदीर जवळ, काटोल, नागपूर, महाराष्ट्र-441302 |
| 2 | एलएक्ससीएएच00316-170046835 लीना नितीन रेगणी आणि नितीन अविनाश रेगणी | 957852/- करीता 10-12-2020 | 09-03-2022 | प्लॉट क्र. 05, मौजे दहोली, सर्वे क्र. 60, टी एस क्र. 18, बल्लारपूर इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी शेजारी, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401 |
| 3 | एलएक्सबीयूएल00315-160020921 रवींद्र जागराव चव्हाण आणि उषा रवींद्र चव्हाण | 1515408/- करीता 23-10-2019 | 09-03-2022 | मालमत्ता क्र. 1405, गट क्र. 336, मौजे एमईडे मलकापूर पांगरा, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, बुलढाणा, महाराष्ट्र 443201. |
| 4 | एलएक्सबीयूएल00116-170026194 अंकुश अण्णा खेडेकर आणि सुनिता अंकुश खेडेकर | 1000526.76/- करीता 04-05-2019 | 09-03-2022 | प्लॉट क्र. 28 भाग, सर्वे क्र. 18/ए, मौजे देऊळगाव राजा, तालुका डी. राजा, जिल्हा बुलढाणा, 443001. |
| 5 | एलएक्सबीयूएल00417-180054462 एकनाथ रामचंद्र गायकवाड आणि कुसुम रामचंद्र गायकवाड | 422212/- करीता 23-06-2021 | 09-03-2022 | घर क्र. 177, प्रभाग क्र. 02, ब्राम्हण चिकना, तालुका लोणार, जिल्हा बुलढाणा, सोमठाणा, महाराष्ट्र 443301 |
| 6 | एलएक्सबीयूएल00316-170030360 अनंता भगवान जयभाये आणि जयश्री अनंता जायभाये | 464446/- करीता 16-01-2018 | 09-03-2022 | पूर्व पश्चिम मोजमाप 28 फूट आणि उत्तर दक्षिण मोजमाप 34 फूट म्हणजेच 88.47 चौ.मी., प्रभाग क्र. 02 एमईडे सावखेड नगरे, ता. चिखली, जिल्हा बुलढाणा महाराष्ट्र, भारत येथील मालमत्ता क्र. 155 चा सर्व खंड आणि भूखंड. |

ठिकाण : महाराष्ट्र
दिनांकित : 13.03.2022

सही/-
प्राधिकृत अधिकारी
(ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरिशन लिमिटेड)

* भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.